गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २९ वा ● गुरुवार १५ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 29 | Date : 15/06/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

## राज्यात आजपासून शाळा सुरु



मुंबई: विदर्भ वगळता आजपासून (१५ जून) राज्यातील शाळा सुरु होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थ्यांनी आनंदाने शिक्षण घेऊन यशस्वी व्हावं, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक वर्षाला गुरुवार दिनांक १५ जून २०२३ पासून सुरूवात होत आहे. शालेय शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थी हे महाराष्ट्राचे भविष्यातील नेतृत्व आहेत. त्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनाने विविध निर्णय घेतल्याचे मंत्री केसरकर म्हणाले. विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यात आले असून एकाच पुस्तकामध्ये सर्व विषयांचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आला आहे. याच पुस्तकात नोंदी घेण्यासाठी वह्यांची पाने देण्यात आली आहेत. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, सॉक्स देण्यात येणार आहेत. शेतीचे ज्ञान आवश्यक असल्याने यापुढे शेती विषय शिकवण्यात येणार असल्याची माहिती देखील मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

कोणतेही काम करण्यात कमीपणा नसतो हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी श्रमाची महती समजून । पान २ वर

## सिध्देश्वर कारखान्याची चिमणी पाडण्यासाठी संचारबंदी जारी



सोलापूर : सोलापूरच्या विमानसेवेला कथित अडथळा ठरलेली श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या चिमणीचे अनधिकृत ठरविण्यात बांधकाम पाडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी प्रशासनाने कारखान्या एक किलोमीटर परिसरात फौजदारी दंड संहिता कलम १४४ नुसार संचारबंदी पुकारली आहे. यात परिसरातील सर्व हाटेल, बार, मंगल कार्यालये, सभागृहे तसेच धार्मिकस्थळे आणि प्रार्थनास्थळे बंद ठेवण्यात आली आहेत.

बुधवारी दुपारपासून पुढील आदेश येईपर्यंत ही संचारबंदी राहणार आहे. पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी हा संचारबंदीचा आदेश जारी केला आहे. याशिवाय कारखान्याचे सर्वेसर्वा धर्मराज काडादी व अध्यक्ष पुष्कराज काडादी यांच्यासह सर्व संचालक मंडळ तसेच सिध्देश्वर साखर कारखाना चिमणी बचावो संघर्ष समितीच्या प्रमुख नेत्यांना नजरकैदेत ठेवण्याच्या हालचालीही सुरू झाल्याचे सांगण्यात आले. सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी सोलापूर महापालिकेने यापूर्वीच बेकायदा ठरविली आहे. या प्रश्नावर न्यायलयीन लढाईही झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने सिध्देश्वर साखर कारखान्याला चिमणी पाडण्यासाठी ४५ दिवसांची मुदत दिली होती. ही मुदत दोन दिवसांपूर्वी संपली आहे. गेल्या २६ मे रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर भेटीत सिध्देश्वर कारखान्याच्या चिमणीला अडथळा दूर करून विमानसेवा सुरू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार अखेर या कारखान्याच्या चिमणीचे बांधकाम पाडण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली असून त्यासाठी बंगळुरू येथील एका कंपनीला पाचारण करण्यात आले आहे. कारखाना संपूर्ण रिकामा करण्यात येत असून आसपासच्या गावांमध्येही राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात केल्या जात आहेत. मात्र यामुळे सोलापूर शहर व परिसरातील वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## आता कल्याणराव काळे माजी चेअरमन फिक्स!

### चेअरमनची उस्तुकता लागलेल्या काळे यांना अभिजीत पाटील यांनी दिले भाळवणी सभेतून उत्तर



पंढरपूर/प्रतिनिधीः सध्या सहकार शिरोमणीची निवडणूक रणधुमाळी अंतिम टप्प्यात पोहचली आहे. सत्ताधारी काळे गटाकडून बिघडलेल्या आपल्या कारभारावर पुढे सुधारणा कशी होईल यावर बोलण्यापेक्षा आमच्या पॅनलच्या मधून चेअरमन पदाचा उमेदवार कोण? याबाबत प्रत्येक गावात विचारणा होत आहे. त्यामुळे आमच्यातील कोणी तर चेअरमन होणार हे तर नक्की आहेच. मात्र कल्याणराव काळे मात्र माजी चेअरमन होणार हे फिक्स आहे. असे उत्तर अभिजीत पाटील यांनी दिले आहे.। पान २ वर

**दीपक पवार यांनी काटामारीचा दिला आकडेवारीत पुरावा**

सहकार शिरोमणी चे निवडणुकीत मागील अनेक दिवसापासून दोन्ही बाजूकडून आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.अशातच मागील निवडणुकीत सत्ता मिळविल्यापासून काळे यांनी दरवर्षी किती काटा मारला हा काटा मारलेला ऊस नेमका कोणाच्या नावे टाकून बिल उचलले, त्यांना प्रत्यक्षात जमीन किती आहे. एवढी सखोल माहिती कारखान्यातून मिळविली असून ती माहिती थेट भाळवणी येथील बैठकीत मांडली आहे.यामुळे सभासद यांची चलबिचल वाढली आहे. याचा परिणाम म्हणून सत्तापरिवर्तन अटळ असल्याचेही दिपक पवार यांनी सांगितले.

## इंडियन मॉडेल ज्युनिअर कॉलेजचे जेईई मेन्स व सीईटी परीक्षेत यश

### ऋतुजा गायकवाड ९५.७६ टक्के मिळवून व्दितीय क्रमांक



अक्कलकोट/प्रतिनिधीः इंडियन मॉडेल ज्युनिअर कॉलेजमधून एम ,एच, टी ,सीईटी २०२३ मध्ये दिव्या म्हेत्रे ९९.२६ टक्के मिळवले व जेईई मेन्स मध्ये ९८.५७ टक्के मिळवून कनिष्ठ महाविदयालयात सर्वप्रथम आली. शिवाय कॉलेजमधून एम,एच,टी, सीईटी २०२३ परीक्षेस एकूण ३५ विदयार्थी प्रविष्ठ झाले होते. एकूण प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांपैकी ऋतुजा गायकवाड ९५.७६ टक्के मिळवून व्दितीय क्रमांक, समर्थ पाटील ९३.०७ टक्के मिळवत तृतीय क्रमांक प्रगती शिंदे ८९.०९ टक्के, श्रध्दा देवकर ८८.१७ टक्के, संप्रिता खुने ८६.१७ टक्के मिळवून घवघवईत यश संपादन केले आहे.या यशस्वी विदयार्थ्यांना कॉलेजच्या प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिध्दराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी सर, संचालिका सायली जोशी मॅडम अम्मा फाऊंडेशनच्या सचिव शीतलताई म्हेत्रे, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणपती वाघमोडे इंडियन मॉडेल स्कूल च्या मुख्याध्यापिका गौरी दातार, यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे

## शैक्षणिक पालकत्व घेतलेल्या दहा मुलींना शैक्षणिक साहित्याची वाटप : कमलाकर सोनकांबळे

अक्कलकोट/प्रतिनिधीः जीवनामध्ये यशस्वी बनायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.या उद्देशाने सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू दहा मुलींना दत्तक घेऊन वर्षभराचे शालेय साहित्याचे वाटप हे जाधवर (धस मॅडम) परिवाराचे कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांनी केले.

अक्कलकोट येथील जाधवर(धस मॅडम)यांच्या निवासस्थानी दत्तक घेतलेल्या दहा मुलींना एकत्र बोलाऊन विविध मान्यवराच्या हस्ते सोमवार दि.१२ रोजी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



**शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना रिंकू जाधवर (धस मॅडम),नवनाथ धस, कमलाकर सोनकांबळे, राजेश जगताप, जय भाऊ पारखे आदी सह उपस्थित होते.**

बोलतांना जय भाऊ पारखे म्हणाले की,आर्थिक परिस्थिती अभावी अनेक मुलांना शिक्षण अर्ध्यावर सोडून द्यावे लागते.त्यामुळे अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी जाधवर धस परिवाराने यंदाही एक दप्तर मोलाचे उपक्रम हाती घेतला आहे.यामध्ये याही वर्षी दहा मुलींचे शैक्षणिक पालकत्व घेत संपूर्ण वर्षभरातील शैक्षणिक दप्तर देऊन जाधवर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. असे म्हणाले. रिंकु अनंतराव जाधवर (धस मॅडम) म्हणाल्या की, यामधून स्वहित,समाजहित .आणि देश हित यासाठी मी काम करत राहणार आहे. हा उपक्रम मी यापुढेही असाच चालू ठेवणार असल्याचे म्हणाल्या.यावेळी कमलाकर सोन,कांबळे, जयभाऊ पारखे, राजेश जगताप,नवनाथ धस,श्याम बाबर लक्ष्मण कोळी,लक्ष्मीकांत सुतार,विश्वनाथ जयभीम आरेनकेरी आदी उपस्थित होते.

## पालखी सोहळ्याच्या निमित्ताने स्वच्छता दिंडीचा शुभारंभ

### स्वच्छ, निर्मलवारीसाठी शासन कटिबद्ध; २१ कोटींचा निधी मंजूर : ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन




पुणे/प्रतिनिधी : आषाढी वारीला अनेक वर्षाची परंपरा आहे. लाखो भाविक वारीसाठी येत असल्याने वारकऱ्यांच्या आरोग्याची, स्वच्छतेची जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. शासन स्वच्छ, सुंदर व निर्मलवारीसाठी कटिबद्ध असून यंदाच्या वारीसाठी २१ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

ग्रामस्वच्छता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या आळंदी ते पंढरपूर मार्गावरील स्वच्छता दिंडीचा शुभारंभ व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील विभागस्तरीय पुरस्काराचे वितरण मंत्री श्री. महाजन यांच्या हस्ते विधानभवन येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार सुनील कांबळे, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन म्हणाले, वारकऱ्यांसाठी दिवाळी, दसऱ्यापेक्षाही आषाढी वारी हा मोठा उत्सव आहे. राज्यातील विविध भागातून वारकरी पंढरपूरला येत असतात. प्रशासनाच्यावतीने वारकऱ्यांसाठी शौचालये, उष्णतेपासून संरक्षणाकरिता तात्पुरता निवारा, पाणी पुरवठा, वैद्यकीय सेवा, स्वच्छतेविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पालखी मार्गावरील रस्ते व परिसराच्या स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले आहे. अस्वच्छतेमुळे रोगराई पसरत असल्याने सर्वांनी शौचालयाचा। पान २ वर

## ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सक्षमीकरणाकरिता संवाद कौशल्य महत्वाचा : मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी

### आरोग्य सहाय्यिका यांचे संवाद कौशल्य व व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेत मार्गदर्शन

सोलापूर/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा दर्जा वाढविण्यासाठी व तत्परतेने सेवा देणे किरिता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा ग्रामीण जनतेशी सुसंवाद वाढण्याची गरज लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य सहाय्यिका यांचे संवाद कौशल्य व व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेत सध्याचे ताणतणाव व संवाद कौशल्यावर आधारित विषयांवर मार्गदर्शन केले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. धन्वंतरी पूजनानंतर धन्वंतरी स्तवनाचे गायन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागतानंतर कार्यशाळेस सुरूवात करण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना सीईओ स्वामी म्हणाले की या




उपक्रमासाठी शासनस्तरावरून किंवा वरिष्ठ स्तरावरून आदेश नाहीत तरी आपल्या जिल्ह्यातील आरोग्य सेवा दर्जेदार व्हावी, तत्परतेने रुग्णांस निस्वार्थी भावनेने सेवा देणेकरिता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यात सुसंवाद वाढावा यासाठी हा एक प्रयत्न. आरोग्य सेवा देताना रुग्णांच्या भावनांना प्रतिसाद द्या , त्यांचे ऐकून घ्या. ग्रामस्थ आणि तुमच्यातील सुसंवाद वाढला तर विश्वास निर्माण होईल. आपले शासकीय कर्तव्य पार पाडताना स्वतःकडे व स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या. सशक्त शरीरात एक सशक्त मन राहतं आणि सशक्त मनाने तुम्ही येणाऱ्या प्रत्येक आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाल. जनतेबरोबरच, आपले सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांशीही सुसंवाद वाढावा. आरोग्य सेवेविषयी ज्या काही तक्रारी प्राप्त होतात ,त्यातील बहुतेक तक्रारी विसंवादामुळेच निर्माण झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. जे आवश्यक आहे तेवढंच बोला, बोलण्याची पद्धत साधी व सौम्य ठेवा.

येणाऱ्या आषाढी वारीमध्ये महिला वारक-यांची संख्या अधिकची असण्याची शक्यता असल्याने त्यांना निसंकोचपणे शुश्रूषा सेवा मिळावी म्हणून या वर्षी महिला वारकर्यांकरिता महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा देण्यात येणार आहेत. येणाऱ्या वारीमध्ये वारकऱ्यांना आरोग्य सेवा देताना विठ्ठलाची सेवा करण्याचे भाग्य आपणांस मिळाले आहे या भावनेतून काम करा, याकडे काम म्हणून न । पान २ वर

# मल्लखांब आणि दांडपट्ट्याच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी परदेशी पाहुणे रोमांचित

## ढोल, तुतारी, लेझीमच्या सहाय्याने अनुभवला आनंद सोहळा

पुणे/प्रतिनिधीः ढोल, लेझीम, तुतारी, मृदंग आणि टाळाचा गजर..... फडकणारे भगवे ध्वज.....श्वास रोखायला लावणारे मल्लखांब आणि मर्दानी दांडपट्ट्यांची प्रात्यक्षिके....कळसूत्री बाहुल्या.... विठुनामाचा गजर..... डोक्यावर फेटा बांधलेले आणि हातात बांगड्या घातलेले प्रफुल्लित चेहरे....गुलाबाच्या पाकळ्यांची उधळण....अशा उत्साहाच्या वातावरणात परदेशी पाहुण्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीच्या साथीने आनंदसोहळा अनुभवला. ‘जी-२०’ डिजीटल अर्थव्यवस्था कार्यगटाच्या बैठकीच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जी-२० प्रतिनिधींसाठीं महाराष्ट्र शासनाच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मल्लखांब आणि दांडपट्ट्याच्या अस्सल मराठमोळ्या खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके पाहून परदेशी पाहुणे रोमांचित झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात सादर झालेल्या शास्त्रीय नृत्यांनीही पाहुण्यांना मोहित केले.

प्रारंभी राज्य शासनाच्यावतीने विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी परदेशी प्रतिनिधींचे स्वागत केले. कार्यक्रमाला पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, विभागीय उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल आदी उपस्थित होते.निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी क्रीडा हायस्कूलच्या मुलांनी पेटत्या मशाली आणि तलवारी घेऊन सादर केलेल्या मल्लखांब प्रात्यक्षिकांनी पाहुण्यांची मने जिंकली. मल्लखांबावर साकारलेल्या मानवी मनोऱ्यांनाही त्यांनी भरभरून दाद दिली. बाटली मल्लखांब प्रात्यक्षिकातील जोखीम, लवचिकता, एकाग्रता आणि संतुलनाचे प्रदर्शनही पाहुण्यांची दाद मिळवून गेले. कोल्हापूरच्या शिवशंभू मर्दानी आखाड्याच्या मुलामुलींनी सादर केलेले दांडपट्ट्यांचे प्रात्यक्षिकदेखील तेवढेच चित्तथरारक होते. या प्रत्यक्षिकांना आलेल्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त दाद दिली. युद्धाच्यावेळी वापरायचा पाश, काठी, भाल्याचे मर्दानी खेळही यावेळी सादर करण्यात आले.

मोर आणि कोंबड्याचे आवरण घालून नृत्य करणारे कलाकारांनी ढोल आणि लेझीमच्या तालावर नृत्य करीत परदेशी प्रतिनिधींचे स्वागत केले. कळसूत्री बाहुल्यांच्या नृत्याचाही प्रतिनिधींनी आनंद घेतला. महाराष्ट्राचा रंगीत फेटा घातल्यावर मोबाईलमध्ये स्वतःची छबी टिपण्याचा मोह त्यांना आवरला नाही. आषाढी वारीच्या निमित्ताने टाळ-मृदंग, एकतारीच्या गजरातही पाहुणे तल्लीन झाले.

महिला प्रतिनिधींनी हातात बांगड्या भरून डोक्यावर फेटा घातल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता. ही उत्साहपूर्ण वातावरणाची आठवण मोबाईलमध्ये कैद करण्यासाठी एकाचवेळी अनेक हात पुढे आले होते.कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठ परिसरात जणू कलासंपन्न महाराष्ट्र प्रकटला होता. सिंहासनावर विराजमान असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा आणि विठोबाची मोठी मूर्ती साकारण्यात आली होती.लेझीम आणि लावणीच्या तालावर पाहुण्यांनी धरला ठेका

मराठमोळ्या अभंगांनी आणि गणेश वंदनेने सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. विठोबा-रखुमाईच्या गजरात वातावरण भक्तिमय झाले. भरतनाट्यम आणि कथ्थक नृत्यातील पदन्यास आणि विविध मुद्रांनी पाहुण्यांना अक्षरशः मोहित केले. डोक्यावर समई घेऊन नृत्यात मनोरे रचणाऱ्या महिला कलाकारांना टाळ्यांच्या गजरात दाद मिळाली. डोंबारी नृत्यातील चित्तथरारक मनोऱ्यांनीही पाहुण्यांना रोमांचित केले तर लावणीचा मनसोक्त आनंदही त्यांनी घेतला. शिवराज्याभिषेक सोहळ्याने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमानंतर लावणीच्या सादरीकरणाची पुन्हा एकदा मागणी करत पाहुण्यांनी आधी लावणी आणि नंतर लेझीमच्या तालावर ठेका धरला. पुणे जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे सर्व प्रतिनिधींनी भरभरून कौतुक केले.



# जिल्हा बाल संरक्षण कक्षाने रोखला होणारा बालविवाह

सोलापूर/प्रतिनिधीः बार्शी तालुक्यातील मौजे ममदापूर येथे होऊ घातलेला बालविवाह जिल्हा बाल संरक्षण कक्षाने रोखला. एका २५ वर्षीय युवकाचा विवाह १५ वर्षीय अल्पवयीन बालिका (रा. मौजे खांडवी ता. बार्शी) सोबत दत्त वस्ती, ममदापूर येथे दुपारी १२ वाजता होणार असल्याची माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे यांना चाईल्ड लाईन १०९८ द्वारे मिळाली. त्यानुसार श्री. वाघमारे यांनी जिल्हास्तरावरून सर्व सूत्रे हलवत होणारा बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

सदर बालविवाह रोखणेकामी पांगरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे, पोलीस उपनिरीक्षक डी. जी. खांडेकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल उर्वते, ग्रामसेविका श्रीमती पतंगे, संरक्षण अधिकारी अमोल जमदाडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती पठाण यांचे पथक तयार केले होते. सदर पथक विवाह स्थळी पोचले असता घरासमोर लग्न मंडप घातलेला दिसून आला. त्याच लग्न मंडपात पिवळ्या रंगाची साडी घातलेल्या, हातावर मेंदी काढलेल्या, हळदीचा विधी पूर्ण करून बसलेल्या बालिकेची सदर पथकाने चौकशी केली. त्यावेळी तिचे वय हे १५ वर्षे असल्याचे लक्षात येताच बालिकेस पोलीस पथकाने आपल्या ताब्यात घेतले. बालिकेचा जबाब नोंदवून बालिकेला बालकल्याण समिती सोलापूर यांच्या समक्ष हजर करण्यात आले. समितीने बालिकेस बालगृहात दाखल करून घेतले आहे.

सदर बालविवाह रोखण्याची यशस्वी कार्यवाही जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. विजय खोमणे, परिविक्षा अधिकारी दीपक धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली .

# तेलंगणा राज्य सारखे पॅटर्न महाराष्ट्रात राबवा, भारत राष्ट्र समिती पक्षाची मागणी

ठाणे/प्रतिनिधी : भारत राष्ट्र समिती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांच्या आदेशानुसार कोकण विभागीय समन्वयक प्रा. विजय मोहिते व माजी आमदार दिगंबर विशे यांच्या मार्गदर्शनातून ठाणे लोकसभा मतदारसंघ समन्वयक धनाजी सुरोसे यांच्या नेतृत्वातून जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, ठाणे जिल्हामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्रापेक्षा आंध्रप्रदेशात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. मात्र तेलंगणा राज्याच्या निर्मितीनंतर १० वर्षाच्या अल्पकालावधीत आलेले तेलंगणा सरकारचे मुख्यमंत्री के .चंद्रशेखरराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकरी बांधवाना दिलेल्या सेवा सुख-सुविधांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या शंभर टक्के थांबल्या आहेत. याचे कारण म्हणजे प्रथम शेतसकाऱ्यांना शेतीसाठी २४ तास लाईट,पाणी मोफत सुविधा, त्यांनी पिकाविलेल्या मालाला एमएसपी प्रमाणे हमीभाव, मोफत ५ लाखाचा विमा मग साधारण मृत्यू असो अथवा अपघाती, वर्षाकाठी मशागत करण्यासाठी प्रती एकरी १० हजार रुपये दिले जातात. बेघर लाभार्थ्यांना टू-बीएचके सारखी घर मोफत दिली जात आहेत, दलित बंधू योजनेतील लाभार्थ्यांना व्यवसाय करण्यासाठी दहा लाख रुपये विनापरतावा दिले जात आहेत, त्याचप्रमाणे महिलांनासाठीही मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या जात आहेत, सरकारकडून राबविल्या जात असलेल्या सर्व योजना सर्वसामान्यांच्या हिताच्या आणि त्यांच्या फायद्याच्या असूनही सुद्धा आज तेलंगणा राज्य हे फायदेशीर व प्रगतशील राज्य आहे. या राज्याचा आदर्श घेऊन महाराष्ट्रातही विकास कामांची सुरुवात करावी ही भारत राष्ट्र समिती पक्षाचे पदाधिकारी धनाजी सुरोसे यांच्या नेतृत्वातून ठाणे जिल्ह्याची मागणी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, ठाणे जिल्हा मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. याप्रसंगी सोबत कळवा मुंब्रा विधानसभा समन्वयक संतोष धोनकोंडा, मकसूद खान,राजन कडू,योगेश वेंगुर्लेकर ,अफाक अन्सारी, सुजाता सांडभोर, पुष्पा ताजने, शांताराम मोरे, विनोद देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# न्यासाचे राज्यात धार्मिक क्षेत्रात उत्कृष्ट व्यवस्थापन : कांचन गडकरी

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले





यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे राज्यात धार्मिक क्षेत्रात उत्कृष्ट व्यवस्थापन असल्याचे मनोगत केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांच्या सुविद्या पत्नी सौ.कांचन गडकरी यांनी व्यक्त केल्या.

त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी त्यांनी महाप्रसादलायची पाहणी करून समाधान व्यक्त केले व त्यांनी सेवा देखील रुजू केले. त्यांच्या समवेत मधुरा गडकरी , प्रदीप खुपसे, अनिल विपत, महेश हिंडोळे, उत्तम गायकवाड हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, आप्पा हंचाटे, प्रवीण देशमुख, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, कल्याण देशमुख, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, सौरभ मोरे, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, अतिष पवार, गोविंद शिंदे, मनसेचे नागु कुंभार, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.


## प्रसिद्ध सनई वादक गणपत कांबळे यांचे दुःखद निधन



वागदरी/प्रतिनिधी : हंगरगा (नळ ) ता.तुळजापूर येथील येथील फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तथा प्रसिद्ध सनई वादक गणपत तुळशिराम कांबळे यांचे दिर्घ आजाराने वयाच्या ८५ वी वर्षी पुणे येथे उपचारा दरम्यान दि.१२ जून २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वा.दरम्यान दुःखद निधन झाले.दिवंगत गणपत कांबळे हे मराठवाड्यातील एक ख्यातनाम सनई वादक होते ते सहशिक्षक सावळाराम कांबळे यांचे वडील होते.त्यांच्या पच्छात दोन मुले एक मुलगी,जावाई,सुना नातवंडे असा परिवार असुन त्यांच्या निधनामुळे मराठवाड्यातील एक उत्कृष्ट सनई वादक काळाच्या पडद्या आड गेला आहे.

त्यांच्या पार्थिवावर मुळ गावी हंगंरगा (नळ) येथील निर्वाण भुमीत दि.१३जून २०२३ रोजी दुपारी १२.०० दरम्यान बौद्ध धम्म संस्कारा नुसार अंतिम संस्कार करण्यात आले.

## शब्दकोडे क्र २९



आडवे शब्द १.दार,कवाड,द्वार ३.नव्यानेच आलेला ५.आझाद हिंद सेनेची घोषणा ९.जाडा,भारदस्त १०.हिंदीत ओठ,अधर ११.नवऱ्याचा भाऊ १२.लहान मुल,बालक १३.त्रास,कष्ट १५.संगीतातील सात स्वर १६.हार,माळ १७.उघडी,काहीही न नेसलेली १८.पसंद,रस १९.हव्यासी,जास्त हाव असलेला २०.चंद्राचा सोळावा भाग २१.रतीपती २२.माज,रग २३.ज्याला यश नाही असा २४.दया,करूणा २५.गाजावाजा,बोभाटा २८.व्यसन,लत २९.गृहीत धरने या अर्थी ३०.खंडोबाला वाहीलेले स्त्री पुरूष ३२.तरू,वृक्ष ३३.वरचेवर,वरकरणी ३५.भकास,उनाड ३६.कठीण ३९.नरम च्या विरूध्द ४१.आवड,फळातील द्रव भाग ४२.भास्कराचार्यांचा गणितशास्त्रावरील प्रसिध्द ग्रंथ ४३.विनंती,आर्जव ४६.जंगल,अरण्य ४८.दिवस,आघात ४९.जू ५१.सैन्याचा दाणागोटा ५४.फासा,पिंजरा ५६.कब्जा ५७.आवरण,सालपट ५९.गाडीवरील आच्छादन ६१.उणे,कमी करणे ६२.मोठे वादय ६३.वाचा ६४.बांग्लादेशाचे चलन ६६.मासा पकडण्याचा आकडा ६७.उष्ण,कोमट ६८.भार,ओझे ७०.भांडण ७२.एक स्वयंप्रकाशीत किटक ७३.तारा,नक्षत्र ७५.एक मौल्यवान लाकुड ७६.उणीव,ददात ७७.लाज,लज्जा ७८.जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध

उभे शब्द १.राजसभा भरण्याचे ठिकाण २.दावा दाखल करणारा,चाबुकाची लांब चामडी पटटी ३.रोख,पैसे देऊन ४.महल,प्रासाद ५.मारून मुटकून,इच्छा नसताना ६.भारताच्या दक्षिणेकडील एक भव्य सागर ७.प्रत्येक,हर,भाव ८.विस्तीर्ण,पसरलेले ९.हिंदीत छायाचित्र १०.बाळाला दिला जाणारा डोस १३.लाग,दम,धीर १४.फळाचे वरील संरक्षक कातडे २०.कपटी म्हणला की त्याच्या मनात --- हे आलेच २३.अलि,वात्रट २६.गवळी चे ग गाळा २७.सुताराचे लाकुड तासण्याचे एक हत्यार २९.पक्का रस्ता,संजय दत्त-पुजा भटट यांचा एक प्रसिध्द चित्रपट ३०.संपत्तीचा हक्कदार ३१.मुरली धारण केलेला ३४.नवरा मुलगा ३५.ओतुन तयार केलेले ३७.ख्रिश्चन धर्मपरिचारीका ३८.फटीतून आत येणारा प्रकाश ४०.उतरण,टेकडीची उतरण ४४.आईचे किंवा वडीलांचें वडील ४७.आश्चर्य ४८.लहान मुलांच्या पायात घालावयाचा एक अलंकार,‘पार्वतीच्या बाळा तुझया पायात --’ एक श्रीगणेश गीत ५०.कोलकात्याचे एक विमानतळ ५२.सटवाई ५३.दार,कवाड ५५.पिकलेला ५६.तवाना,टवटवीत ५८.केस विंचरण्याचा लहान आणि बारीक कंगवा ६०.लवकर,जलद ६१.अंगावर मारल्याची खुण ६२.उदयानंतरचा दिवस ६५.कर्म,काज ६७.वादयांचा आवाज ६८.मांजराचा जोडीदार ७१.कविता करणारा ७२.दुभत्या गाईची ओटी ७३.धातुचे सूत ७४.एक विदेशी दारू ७५.सन,शके

# महाआरती आणि चारा वाटप करुन आदित्य ठाकरेंचा वाढदिवस साजरा

करमाळा/प्रतिनिधी : युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त येथील कमलाभवानी मंदिरात नगराध्यक्ष वैभवराजे जगताप आणि शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख शाहू दादा फरतडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

तसेच गुरु गणेश गोशाळा येथे तालुकाप्रमुख सुधाकर काका लावंड, शहरप्रमुख प्रविण कटारिया,संतोष गानबोटे, लालासाहेब कुरेशी यांच्या हस्ते चारावाटप करण्यात आला.


यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख मयुर यादव,युवासेना जिल्हा सरचिटणीस सोहेल पठाण, युवासेना तालुकाप्रमुख समाधान फरतडे,वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष



विशाल लोंढे, तालुका समन्वयक कुमार माने,तालुका सरचिटणीस पांडुरंग ढाणे, शहरप्रमुख समीर हलवाई, युवासेना शहर उपप्रमुख कल्पेश राक्षे, युवासेना उपप्रमुख प्रसाद निंबाळकर,पैलवान ग्रुप अध्यक्ष पै.पप्पू चोरमुले, पै.रोहन साळुंखे, गणेश कुकडे,तानाजी कुकडे, राहुल कुकडे,अतुल देवकर, रोहिदास आल्हाट, बाळासाहेब कांबळे संजय पडवळे, सर्जेराव मांगले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि युवासैनिक उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या वतीने जेष्ठ पत्रकार चेतन जाधव यांचे वाढदिवस साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, शाखा अक्कलकोटचे सदस्य जेष्ठ पत्रकार चेतन जाधव यांचे वाढदिवस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा अक्कलकोट यांच्या वतीने साजरा करण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, सचिव विश्वनाथ चव्हाण, राजेशकुमार जगताप, समाधान अहिरे, गौतम बाळशंकर, दयानंद दणुरे, सामाजिक कार्यकर्ते जय पारखे, शाम बाबर उपस्थित होते



# सभासदानो जुलमी चेअरमनच्या कचाट्यातून मुक्त व्हा: अभिजीत पाटील

## परिवर्तनासाठी आंबे येथून ७०टक्के मतदान देण्याचा गावकऱ्यांचा निर्धार




**आंबे येथील एकूण सभासद २८७ आहेत. मयत संख्या ४२आहे. यामधून या गावातून ७०टक्के मतदान अभिजीत पाटील यांच्या गटाचे उमेदवार यांना देण्याचा मानस असल्याचे राजाराम सावंत यांनी गावकऱ्यांच्या वतीने जाहीर केले आहे.**

पंढरपूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणीचे विद्यमान चेअरमन कल्याणराव काळे यांनी मागील अनेक वर्षापासून सत्ता भोगत असताना, चेअरमन पदाचे कर्तव्य पार पाडले नाही. त्यामधून सभासदाचे हित न पाहता त्यांचे आणि कामगार वर्गाचे केवळ शोषणच केले आहे. यामुळे या जुलमी चेअरमनच्या कचाट्यातून मुक्त होण्यासाठी हीच वेळ आली आहे. त्यामुळे कोणत्याही दबावाला बळी न पडता या निवडणुकीत आमच्या परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवारांना मते देऊन परिवर्तनाचे लढ्याला यश द्या असे आवाहन विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे.

तालुक्यातील आंबे येथील बैठकीत अभिजीत पाटील यांनी वरील आव्हान केले आहे. पुढे बोलताना त्यांनी सांगितले आहे की, या कारखान्यात बिल उशिरा दिले जाते. याबाबत सभासद यांच्यामधून आवाज ऐकावयास मिळाला होता. परंतु काही जवळच्या लोकांना कांडी पुरल्यावर बिल दिले जात होते. त्यामुळे एकास एक दुजाभाव का करण्यात आला होता. याबाबत जाब विचारण्याची संधी या मतदानाच्या रूपाने आली आहे. प्रत्येक शेतकऱ्याचा काटा हानून वाडीकुरोली येथील एका शेतकऱ्याच्या नावे दोन हजार टन उसाचे बिल काढले गेले असल्याचा गौफ्यस्फोट ही यावेळी अभिजीत पाटील यांनी केला आहे.

पुढे बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की विरोधक यांनी सध्या मी विठ्ठल चे संचालक यांचे नावे काढलेले ४०कोटी रुपये याबाबत भलतेच बोलू लागले आहेत.ते कर्ज आपण केलेली घाण काढण्यासाठीच काढले असल्याचा खुलासाही यावेळी पाटील यांनी केला आहे. भालके यांनीही आपणास विठ्ठल कारखान्याचे पैसे कोणाकडे आहेत. असा प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना बाकीचे लोकांचे राहूदे म्हणत भालके कुटुंबातील लोकाकडे असलेल्या पैसेची लाखो आणि कोटीत आकडेवारी सांगितली आहे. मी ज्या प्रमाणे विठ्ठलचे गाडी, डिझेल आणि इतर सुविधा वापरनार नाही. असे निवडणुकीत ठणकावून सांगितले होते. त्याप्रमाणे हे काळे चेअरमन या निवडणुकीत का बोलत नाहीत असेही सांगितले. मी काटा मारतात म्हणून ओरडून सांगत असताना हे यापुढे तरी आम्ही काटा मारणार नाही असे सांगण्याचे धाडस का दाखवीत नाहीत. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मागत. काळे गटाकडून होणाऱ्या आरोपाचा योग्य पद्धतीने खुलासाही केला आहे.

यानिवडणुकीत आपण पराभव होणार हे गृहीत धरूनच त्यांनी आतापासून विठ्ठल ची निवडणूक लढविण्यासाठी सर्वांना एकत्रित करीत नवीन खेळी चालवली असल्याचेही अभिजीत पाटील यांनी स्पष्ट सांगितले आहे. यावेळी राजाराम सावंत, औदुंबर शिंदे, सचिन पाटील, तुकाराम मस्के, संभाजीराजे शिंदे,दिपक पवार, डॉ रोंगे सर, यांनी काळे यांच्यावर सडकून टीका केली. यावेळी सुभाष भोसले, विष्णूभाऊ बागल, शशी पाटील, सचिन अटकले, आदी सह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या बैठकीत अनेकांनी अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी प्रवेश केला.

# पालखी प्रस्थान दिनी आरंभ फाउंडेशन कडून १००१ वृक्षारोपण सोहळा पार पडला

पुणे/प्रतिनिधी :ज्ञानोबा तुकोबांचा पालखी प्रस्थान दिनी रामटेकडी, हडपसर ,पुणे येथे १००१ /झाडांच्या वृक्षारोपणाचा पहिला टप्पा पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे ट्री मॅन वनश्री पुरस्कार प्राप्त रघुनाथ ढोले सर ,सोहम कोरे( ेशिश्रळरलश्रश ाशलहरीपळली )दुष्यंत जगताप (माणूस परिवार), संदीप जगताप (सामाजिक कार्यकर्ते), वनपाल महेश सकपाळे , वनरक्षक मधुकर गोडगे उपस्थित होते. अनेक निसर्गप्रेमी, संवर्धनशील नागरिक यांच्या श्रमदानातून वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये लहान मुले ते ज्येष्ठ नागरिक सर्ववयोगटातील लोकांनी सहभाग घेतला. बघता बघता मिनी जंगल उभे राहिले .



मान्यवरांच्या हस्ते पिंपळवृक्षाचे पूजन करून वृक्षारोपण करण्यात आले. प्रत्यक्ष फिल्डवर भगिनींनी मान्यवरांना औक्षण ,पुष्प वर्षा करून स्वागत केले.छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिमा पूजन करून सत्कार करण्यात आला .संस्थेच्या अध्यक्षा वैष्णवी पाटील यांनी आरंभ फाउंडेशनच्या आत्तापर्यंतच्या कार्याचा आढावा दिला. संतांच्या वारी बरोबर आपण वृक्ष संवर्धनाची वारी करत आहोत. ती निसर्गदेवता आणि भगवंताच्या चरणी समर्पित करत आहोत असे सांगितले. त्यानंतर तळागाळात मातीत हात घालून काम करणारे , निसर्ग संवर्धन कार्यासाठी सढळ हाताने आर्थिक सहयोग देणारे बंधू-भगिनींना सेवारत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.श्री.रघुनाथ ढोले सरांनी मनोगत व्यक्त करत असताना ,आरंभ फाउंडेशन आयोजित कार्यक्रमाचे कौतुक करत .सर्वांना वृक्षांची गरज याबद्दल माहिती दिली. ४०० वर्षापासून वृक्षतोड होत आहे .निसर्गातील सर्व घटकांच्या हक्काचे घर, जंगल पुन्हा आपण त्यांना परत केले पाहिजे ,त्यामुळे झाडे लावून सर्वांनी आपापल्या परीने खारीचा वाटा उचलला पाहिजे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सायली कुलकर्णी यांनी केले.दुष्यंत जगताप ,सिद्धेश्वर कोरे, वृषाली आटोळे ,सुनील खोत ,सोहम पोरे यांना सेवा रत्न पुरस्कार देण्यात आला.ढोले सरांना संस्थेच्या सदस्यांकडून बिया भेट देण्यात आला. या उपक्रमास तानाजी भोसले ,वृषाली आटोळे, भोलेश्वर पलंगे, श्रावणी पाटील,सुहास कडू ,मनोरमा कोरे ,सायली तांबडे, तेजस्विनी खोत , मीनाक्षी थोरात, डॉ. सायली कुलकर्णी , उल्हास पठाडे, विनायक पाटील ,आदित्य पाटील, बालाजी बिराजदार, सौ.पठाडे,अनिल खोत,वंदना तांबडे, प्रतीक तांबडे,प्रगती नावले,रिलायबल मेकेट्रोनिक्स ग्रुप, गोरख कामठे ,निनाद टेमगिरे ,मंगेश सावंत, जयश्री साळुंखे ,निलेश जगताप,विशाल कुंजीर, संदीप मोकाशी ,सोमनाथ काळे अखिल भारतीय मराठा महासंघाचे सदस्य ,निसर्गप्रेमी,संवेदनशील नागरिक ,अनेक संस्था,तरुणवर्ग या वृक्षारोपणास उपस्थित होते.

# अंमली पदार्थ विरोधी जनजागृति पंधरवडा नळदुर्ग शहरात सुरुवात

नळदुर्ग/प्रतिनिधी :नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय विभाग, परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने नळदुर्ग शहरात नशा बंदी मंडळ यांनी काढलेले माहिती पत्रकाचे वाटप पानपट्टी चालक, रिक्षा चालक, एस टी चालक यांना करण्यात आले व अमली पदार्थ विरोधी पंधरवडा जनजागृति करण्यास सुरूवात केली आहे असे मारुती बनसोडे यांनी सांगीतले यावेळी धरित्री विद्यालयाचे शिक्षक व राज्यस्तरीय साने गुरुजी कथा मालेचे अध्यक्ष आदर्श शिक्षक सुनील पुजारी यांनी युवकांनी व्यसनापासून दूर रहावे असे आवाहन केले आहे. दि.१२ ते २६ जून या कालावधीत राज्यात अमली पदार्थ विरोधी सप्ताह साजरा करण्यात येत आहे.शाळा, कॉलेज मध्ये या विषयावर जनजागृति करण्यात येणार आहे.ग्राम पंचायत, बचत गटांच्या माहीला, शेतकरी, युवक यांच्यासाठी ही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे अशी माहिती उस्मानाबाद जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी दिली आहे.या वेळी अनेक नागरिकांनी माहिती पत्रक वाचून नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे



अभिनंदन केले आहे. यावेळी राजेंद्र गुरव यांनी सर्वांना माहिती पत्रक वाटप केले

# महेश इंगळेंच्या हातून होणारी स्वामी सेवा वंदनीय : कांचन गडकरी

अक्कलकोट/प्रतिनिधी : सेवा, सहकार, भक्ती, धर्म या चौसूत्रींचा सार अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या भक्तीमध्ये आहे. मी ही व गडकरी कुटूंबीय निस्सीम स्वामीभक्त असल्याने या चौसूत्रींचा अवलंब करत स्वामी भक्ती करीत असते. त्यामुळे स्वामीभक्तीतून जीवनात होणारी फलप्राप्ती हे खूपच फलदायी आहे. त्या माध्यमातून होणारी फलप्राप्ती जीवनाला व जीवनातील स्वामी भक्तीला पूरक आहे. हा सर्व सार मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या जीवनालाही लाभलेला आहे.



कारण ते श्री स्वामी समर्थांच्या मूळ स्थानी म्हणजेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात अविरतपणे सेवा देत आहेत. म्हणून महेश इंगळेंच्या हातून होणारी स्वामी सेवा वंदनीय असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांच्या सुविद्य पत्नी सौ.कांचन गडकरी यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले व आ.सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी कांचन गडकरी व त्यांच्या समवेत असलेले मधुरा गडकरी, प्रदीप खुपसे, अनिल विपत यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी गडकरी बोलत होत्या. पुढे बोलताना गडकरी यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व स्वामी भक्तांचा विस्तार भविष्यात वाढतच राहणार आहे. त्यामुळे मंदिर समितीचे प्रमुख महेश इंगळे यांना मोठ्या प्रमाणात स्वामी समर्थांच्या सेवेच्या माध्यमातून भाविकांची सेवा करता येणार आहे. ही त्यांच्याकरिता खूपच समाधानकारक व स्वामी सेवेचे फलदायी समाधान देणारी बाब ठरणार आहे. त्याकरिता त्यांनी पुढील जीवनाच्या काळात नेहमी सजग राहावे असेही आव्हानात्मक मनोगत गडकरी यांनी व्यक्त करून मंदिर समितीच्या व महेश इंगळे यांच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी नगरसेवक महेश हिंडोळे, उत्तम गायकवाड, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, गिरीश पवार, विपूल जाधव, श्रीकांत मलवे आदीसह स्वामीभक्त उपस्थित होते.

# शिक्षकांचे विविध प्रलंबित मागण्या मंजूर करण्यासाठी आंदोलन

कळंब/प्रतिनिधी : उस्मानाबाद शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या असून त्या सोडविण्यात याव्यात या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर दि.१२ जुन आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील प्राथमिक पदवीधर शिक्षकांना त्यांच्या विनंतीनुसार पदावनत करण्यात यावे. पदवीधर शिक्षक या पदावर दर्जा वाढ द्यावी, प्राथमिक शिक्षकातून केंद्रप्रमुखांची रिक्त पदे भरण्यात यावीत, वैद्यकीय प्रति प्रतिपूर्ती देयक प्रस्ताव निकाली काढावेत. भविष्य निर्वाह निधी परतावा व ना परतावा अग्रीम प्रस्ताव मान्य करण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात यावेत. २०२०-२१ संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे केलेले समायोजन कायम करण्यात यावे. वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी पात्र शिक्षकांना वेतनश्रेणी देण्यात यावी. पदोन्नती प्राप्त सेवानिवृत्त मुख्याध्यापकांना रजा रोखी करण्याचा




लाभ देण्यात यावा.चालू वर्षाच्या जिल्हा शिक्षक पुरस्कार सोबत मागील तीन वर्षाचे प्रलंबित असलेले जिल्हा शिक्षक पुरस्कार देण्यात यावेत. दीर्घ वास्तव्य असलेल्या विषय तज्ञ व साधन व्यक्ती यांच्या बदल्या करण्यात याव्यात. कोरोना काळात संकलित झालेल्या निधीचा योग्य विनियोग करण्यात यावा. व बिंदू नामावली (रोस्टर)अद्यावत करण्यात यावी. या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, जिल्हाध्यक्ष संतोष देशपांडे, लक्ष्मण पडवळ, सरचिटणीस विठ्ठल माने, प्रसिद्ध प्रमुख प्रदीप म्हेत्रे, राहुल भंडारे, दत्ता पवार, रामेश्वर शिंदे,शिवाजी शिंदे, डी.डी कदम, बालाजी मसलगे, सुदर्शन जावळे, संतोष मोळवणे, सुधीर वाघमारे, श्रीनिवास गलांडे ,उमेश भोसले, सोमनाथ टकले, भक्तराज दिवाने,अर्जुन गुंजाळ, शेषराव राठोड,हनुमंत पडवळ, शिवाजी दराडे, मोहनराव जगदाळे, बालाजी माळी, सचिन राऊत, एम वाय चाटे, एम ए पुरी,आर. एन. हलसीकर, यु आर भोसले, आदी सह शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

# छोट्या वृक्षांचे आज वटवृक्षमध्ये रूपांतरण झाल्याचे पाहून मनस्वी आनंद : सिद्धाराम सालीमठ

अक्कलकोट/ प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली ३६ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या छोट्या वृक्षांचे (अन्नदानाचे कार्य) आज वटवृक्षमध्ये रूपांतरण झाल्याचे पाहून मनस्वी आनंद होत असल्याचे मनोगत अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी व्यक्त केले.



ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले

असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत तहसीलदार बाळासाहेब सिरसट व मैंदर्गीचे काशिनाथ दिवटे, नागप्पा दुर्गे हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, सौरभ मोरे, पिंटू दोडमनी, गोटू माने, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# दुधनी आडत-व्यापार असोसिएशनचे अध्यक्ष पदी बसवराज परमशेट्टी

## तर उपाध्यक्षपदी राजशेखर दोशी यांची निवड

दुधनी/निंगप्पा निंबाळः दुधनी- कृ. उ.बा. समतिचे निकालानंतर माजी असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष परमशेट्टी यांनी राजीनामा दिले. त्यानंतर आडत व व्यापारी वर्ग कृ. उ.बा. समतिचे नुतन सभापती सातलिंगप्पा उर्फ अप्पु परमशेट्टी यांनी सगळे मिळून एक जनरल बैठक घेण्यात आली या बैठकीत दुधनी आडत व्यापार असोसिएशनचे अध्यक्ष पदी कोण होणार? असे प्रश्न परमशेट्टी यांनी केले असता बैठकीतल आडत व्यापारी यांनी सांगितले कि अध्यक्ष पद निवड आम्ही सभापती वर सोपवुन देऊ असा या बैठकीत निर्णय झाला. त्यानंतर आज मंगळवार रोजी दुधनी आडत- व्यापार असोसिएशनचे अध्यक्ष पदी बसवराज परमशेट्टी, उपाध्यक्ष पदी राजशेखर दोशी व शिवशरणप्पा हबशी



यांची निवड दुधनी बाजार समितीचे सभापती अप्पु परमशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. अंबण्णा निंबाळ- सेक्रेटरी, चन्नप्पा ठक्का- खजिनदार व भिमाशंकर अंदेनी, अशोक पादी, महांतेश बिराजदार, सैदप्पा परमशेट्टी, संजय नुला, यांना संचालक पदी निवड करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक महेश पाटील, अतुल मेळकुंदे व आडत व्यापारी राजशेखर सोळसे,

महाविर दोशी, मल्लीनाथ येगदी, गुरुशांत माड्याळ, हणमंत कलशेट्टी, गुरुशांत उप्पीन,फुलारी सर, बाबा टक्कळकी, सातू अंदेनी, शांतु वागदरी, अर्जुन पुजारी इ.तसेच आडत व्यापारी व शेतकरी उपस्थित होते.